वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचे पृष्ठ

# महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई ( पुरुष ) ( सेवाप्रवेश ) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि सेवाप्रवेश नियमात केलेल्या दिनांक २३.०६.२०२२ रोजीच्या सुधारीत तरतुदीनुसार समादेशक , राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५ दौंड यांचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक **०५.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४** या कालावधीत स्विकारण्यात येतील. हया बद्दलची सविस्तर माहिती policerecruitment२०२४.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास सशस्त्र पोलीस दलातील समादेशक यांच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरीता संपूर्ण महाराष्ट्रात राज्यात फक्त एका घटकात अर्ज सादर करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम १०० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही राज्य राखीव पोलीस बलातील सर्व गटांमध्ये **एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती ( Provisional selection ) असेल . **शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यांत येईल.**
- सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारीरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या संबंधित घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात ( Unreserved ) अर्ज करु शकतात. परंतू खुल्या प्रवर्गातील ( Unreserved ) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात आवेदन अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय , मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५ / २०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

29|12

( गणेश बिरादार )
समादेशक ,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५ दौंड

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

**महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२२-२३**
**समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५ दौंड**

जाहिरात क्रमांकः- ठिकाण - दौंड (पुणे) दिनांक २९/०२/२०२४

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई ( पुरुष ) ( सेवाप्रवेश ) नियम २०१२ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार समादेशक, राज्य राखीव पोलीस बल , गट क्र. ५ दौंड यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२३ मध्ये सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी २३० पदे भरण्यासाठी सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **सशस्त्र पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ३० | १६ | ०७ | ०६ | ०८ | ०५ | ०५ | ४४ | २३ | २३ | ६३ | २३० |
| कप्पीकृत आरक्षण ⇩ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १५ | १० | ०६ | ०५ | ०७ | ०४ | ०४ | २७ | १५ | १५ | ३७ | १४५ |
| खेळाडु | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| प्रकल्पग्रस्त | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| भुकंपग्रस्त | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०४ |
| माजी सैनिक | ०५ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०३ | ०३ | १० | ३५ |
| अंशकालीन पदवधीर | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| पोलीस पाल्य | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| गृहरक्षकदल | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | १० |
| अनाथ | | **महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२ / प्र.क्र.१२२ /का- ०३, दिनांक ०६.०४.२०२३ नुसार एकुण रिक्त पदांच्या १% व मागील ०१ पदअनुशेष** | | | | | | | | | | |

29/2

**( गणेश बिरादार )**
समादेशक ,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५ दौंड